# Vande Mataram Auditorium



**Statue of Bharat Mata at the entrance of auditorium**




**Vande Mataram Auditorium**



**Innauguration with lightening of lamp by Hon.Chadrakant Dada Patil, Minister,Higher and Technical Education,Maharashtra**



**Welcome Song by the Students of Music Department,Government College Of Arts & Science, Aurangabad**



**Inguaral Address by Hon.Chandrakant dada Patil,Minister,Higher and Technical Education,Maharashtra**



**Hon.Vikaschandra Rastogi, Chief Secretary,Higher and Technical Education,Maharashtra**



**Audience in inguaral function**



**Hon. Director, Dr. Shailendra Deolankar, Higher Education welcomed Dr. Promod Yeole,**

## Photos and Information Displayed in the Gallary of Audiotorium




## Photos of freedom fighters






**Government College Boys Hostel, THE PLACE FROM WHERE THE CLARION CALL OF VANDE MATARAM WAS GIVEN**



**Arts faculty of the college commenced its work from the ancient building of Mardana mahal (Part of Aurangzeb's residence)**



**Pamar kothi , the first administrative building of the college**



**Aadil Darwaza ,the main entrance of the college after renovation under smart city project**



# NEWS

## शिवानी अढागळे यांचा देशात २३१ वा क्रमांक



**औरंगाबाद :** शिवानी प्रल्हाद अढागळे यांनी 'नेट जेआरएफ'सह परीक्षेत यश मिळविले. त्यांनी देशातून लाईफ सायन्स बॉटनी परीक्षेत २३१ वा क्रमांक पटकावला असून, ९३.८८ परसेंटाईल स्कोर आहे. त्यांना भाऊराव चौसंष्टे यांचे मार्गदर्शन लाभले. शिवानी अढागळे यांनी शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयातून बी.एस्सी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून एम.एस्सी उत्तीर्ण केली आहे.

## शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयासाठी १० कोटी

### अर्थसंकल्पात काय मिळाले?

प्रतिनिधी | औरंगाबाद

राज्यातील १६ जिल्ह्यांत महिलांसाठी १०० खाटांचे स्वतंत्र सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा निर्णय राज्याच्या अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. त्यात औरंगाबाद जिल्ह्याचा समावेश आहे. त्याशिवाय अजिंठा-वेरूळसह जिल्ह्यातील पुरातत्त्व स्मारकांच्या जतनासाठीही समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पर्यटन वाढीसाठी त्याचा जिल्ह्याला फायदा होणार आहे.

शहरात अंतिम टप्प्यात काम झालेल्या वंदे मातरम सभागृहाकरिता ४३ लाखांचा निधी अर्थमंत्री अजित पवार यांनी मंजूर केला.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचे स्मारकही तयार करण्यासाठी तरतूद करण्यात आली. या सोहळ्याची कार्यक्रमांची रूपरेषा तयार करण्यासाठी मराठवाड्यातील मंत्री, पा[illegible]कमंत्री यांचा समावेश असणारी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णयही घेण्यात आला.

पुरातत्त्व स्मारकांच्या जतनासाठी औरंगाबादसह प्रत्येक जिल्ह्यात महावारसा समित्या तयार करण्यात येणार आहेत. जालन्यात प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर सेंटर उभारले जाणार आहे. औरंगाबादसह राज्यातील प्रत्येक ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रियेविना किडनी स्टोन काढण्याची लिथोट्रिप्सी उपचार पद्धती विकसित करण्यासाठीही तरतूद करण्यात आली. शासकीय रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी फेको उपचार पद्धतीसाठी तरतूद केली.

जायकवाडी येथे जलपर्यटनाची सोय, फर्दापूर येथील जमिनीचा विकास करून पर्यटन सुविधा, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयासाठी १० कोटींची तरतूदही अर्थमंत्री अजित पवार यांनी केली आहे.

दिव्य मराठी 10/12/2022

**उद्घाटन • शैक्षणिक धोरणात तंत्रज्ञानासोबत इतिहासही हवा : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील**

## वंदे मातरम् सभागृह चळवळीचे केंद्र बनावे

प्रतिनिधी | औरंगाबाद |

देशात वंदे मातरम् म्हणण्यासाठी विरोध होत असताना विद्यार्थ्यांनी ज्या जागेतून वंदे मातरम गाण्याची चळवळ सुरू केली त्याच ठिकाणी भव्य असे वंदे मातरम् सभागृह उभारण्यात आले. हे सभागृह चळवळीचे केंद्र बनावे, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

९ डिसेंबर रोजी पाटील यांच्या हस्ते या सभागृहाचे उद्घाटन झाले त्या वेळी ते बोलत होते. पुढे बोलताना पाटील म्हणाले, मराठवाडा स्वातंत्र्यसंग्रामात आहुती देणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य पुढच्या पिढीला माहिती होणे अपेक्षित आहे. सध्याच्या इतिहासात याची सोय नाही. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलदेखील दोन पाने आहेत. तीदेखील गोष्टरूपाने. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अगदी संक्षिप्तपणे मांडण्यात आले आहे. आपली संस्कृती आजही जगाला दिशा दाखवणारी आहे. हे पुढच्या पिढीला कळायला पाहिजे यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात नव्या टेक्नॉलॉजीसह पुढच्या पिढीला देशाच्या जाज्वल्य इतिहास कळावा याची काळजी घेतली जाईल. त्यासाठीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरण घोषित केले आहे, असे ते म्हणाले.

या वेळी सहकारमंत्री अतुल सावे, विधानसभेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार प्रदीप जैस्वाल, हरिभाऊ बागडे, उदयसिंह राजपूत, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, डॉ. उल्हास पाटील, कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, के.व्हीएस सर्मा, पोलिस आयुक्त निखिल गुप्ता, जिल्हाधिकारी आस्तिककुमार पांडेय, पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया, सिडकोच्या प्रशासक दीपा मुधोळ-मुंडे, डॉ. सतीश देशपांडे, राजेंद्र सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी मराठवाडा गीत, वंदे मातरम

### किलेअर्क येथे वंदे मातरम् सभागृहाचे अखेर लोकार्पण



सभागृहाच्या उद्घाटनप्रसंगी सहकारमंत्री अतुल सावे, विधानसभेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी.

### मराठवाडा विकासासाठी स्वतंत्र निधी द्या

देशाचा ७५ वा स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा केला जातो आहे. मुक्तिसंग्राम दिनालाही ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने मराठवाड्याच्या विकासासाठी स्वतंत्र निधी द्यावा अशी मागणी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केली. गावातील मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या स्मारकाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी आमदार हरिभाऊ बागडे यांनी केली.

### वंदे मातरम सभागृह एजन्सीला चालवायला द्या

सिडकोने हे सभागृह उभारले आहे. उच्च तंत्रशिक्षण विभागाकडे असलेली ही इमारत विभागीय आयुक्तांकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. ती एजन्सीला चालवण्यासाठी देण्यात यावी अशी सूचना करण्यात येणार आहे. व्यावसायिक कार्यक्रमांसाठी वेगळे भाडे, चळवळ, प्रबोधनाच्या कार्यक्रमासाठी वेगळे दर असतील. सभागृह शासनाकडे असले की त्याची काय अवस्था होते, हे सगळ्यांना माहिती आहे, असे पाटील म्हणाले.

### लोकार्पणासाठी मंत्र्याची वाट पाहू नका

अनेक महिने होऊनही मंत्र्यांची वेळ न मिळाल्यामुळे सभागृहाचे उद्घाटन होत नाही. यापुढे विकासकामांचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करून वापरात आणावे. मंत्र्याचा वेळ मिळाला की त्यांची भेट आयोजित करून आढाव्याचा कार्यक्रम घ्यावा, अशी सूचना चंद्रकांत पाटील यांनी केली.